# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील थॅलेसेमिया, सिकल्सेल, हिमोफिलीया या आजारांनी ग्रस्त रुग्णांना अत्यावश्यक सुविधा पुरविण्याबाबत.**

**(१) ३६५२ (२५-११-२०१४). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील थॅलेसेमिया, सिकल्सेल, हिमोफिलीया या आजारांनी ग्रस्त रुग्णांना अत्यावश्यक सुविधा तातडीने पुरविण्यात याव्यात अशी मागणी लोकप्रतिनिधींनी सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे दिनांक ९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (३०-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर पत्र दिनांक १५/११/२०१४ रोजी प्राप्त झालेले आहे.

(२) उक्त निवेदनातील मुद्यांसंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, रक्त देण्याच्या ठिकाणी सलाईन वॉश नियमित होते. त्यामूळे रक्त फिल्टर करून देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरीत रक्त पेढयांकरीता ल्युकोडिप्लीटेड ब्लडबॅग खरेदी करण्यात येतात.

सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रकल्प क्षेत्रातील २१ जिल्हयामधील ग्रामिण/ उपजिल्हा/ जिल्हा व स्त्री रुग्णालयामध्ये मोफत सोल्युबिलीटी, इलेक्ट्रोफोरेसीस व HPLC चाचणीची सोय उपलब्ध आहे. सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सिकलसेल रुग्णांची KFT, LFT, CBC व इतर आवश्यक रक्त चाचण्या मोफत करण्यात येतात. तसेच दिनांक ०५/१२/२००१ च्या शासन निणर्यान्वये सिकलसेल रुग्णांना सर्व शासकीय व निमशासकीय रुग्णालयातून आवश्यकतेनूसार मोफत रक्तपुरवठा तसेच गरजेचा औषधोपचार मोफत करण्यात येत आहे. तसेच जिल्हा रुग्णालये ठाणे, नाशिक, सातारा, अमरावती, केईएम रुग्णालय, मुंबई व बीजे वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथे थॅलेसेमिया व हिमोफिलीया या आजारांवर मोफत उपचार करण्यात येतात.

अमरावती येथील रक्तपेढीत तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली असून रुग्णांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होत नाही.

Tab-Desirox २५०(Cipla) हे औषध ठाणे, नाशिक, सातारा, अमरावती येथील शासकीय रुग्णालयामधून रुग्णांना मोफत देण्यात येत आहे.

सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डागा स्मृती शासकीय स्त्री व बाल रुग्णालय, नागपूर येथे गर्भजल परिक्षण केंद्र स्थापन करण्याची प्रक्रीया सुरू आहे. सदर गर्भजल परिक्षण केंद्र सुरू झाल्यावर सदर केंद्रात सिकलसेल रुग्ण गर्भवती महीलांची मोफत गर्भजल चाचणी करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील 'आशा' या स्वयंसेविकांचे नासंमतीने राजीनामे घेतल्याबाबत**

**(२) ७४७३६ (१८-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य अभियानाचे अधिकाऱ्यांकडून 'आशा' या स्वयंसेविकांचे नासंमतीने राजीनामे घेतले जात असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'आशा' या स्वयंसेविकांवर अन्यायकारक निर्णयाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणांतील दोषी असणा-या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-१०-२०१८) :** (१) हे अशतः खरे आहे,

माहे जानेवारी २०१७ च्या दरम्यान महाराष्ट्र टाईम्स मध्ये "राजकिय सक्षमीकरण नव्हे खच्चीकरण" या सदराखाली आशा स्वयंसेविके संदर्भातील बातमी प्रकाशित झालेली होती.

(२) आशा स्वयंसेविकेची मुख्य जबाबदारी ही रुग्णांना संदर्भसेवा देणे ही असून आशा स्वयंसेविकेस वारंवार शासकीय आरोग्य संस्थेमध्ये रुग्णासह उपस्थित रहावे लागते. त्यामुळे आशा स्वयंसेविकांना त्यांच्या पदा व्यतिरिक्त इतर पदांची जबाबदारी दिल्यास आशा स्वयंसेविकेच्या कामावर विपरित परिणाम होवून ती निश्चित केलेल्या कामास न्याय देवू शकणार नाही. त्यामुळे आशांना सार्वजनिक निवडणूकीमध्ये विजयी झाल्यानंतर निर्वाचित सदस्यांचे पद स्विकारल्यानंतर आशा स्वयंसेविका/ गटप्रवर्तक यांच्याकडून पदाचा राजीनामा देण्याबाबत दि.१५ एप्रिल, २०१५ रोजी जिल्हास्तरावरून सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुपोषित मुलाच्या मृत्युनंतर त्यांच्या पालकांना शासनाने जाहीर केलेली मदत न मिळाल्याबाबत**

**(३) ८५४२६ (२२-०८-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५-२०१६ यावर्षात कुपोषित मुलाच्या मृत्युनंतर शासनाने मदत जाहिर करुन मृत मुलांच्या पालकांना ९ महिन्याचा कालावधी नंतरही मदत देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्हयात गेल्या वर्षी खोटा गावात कुपोषणामुळे मृत्यू पावलेल्या मुलांच्या पालकांना भेटून त्यांचे सांत्वन करुन ५१ हजार रुपयांची मदत देण्याचे मा.महिला व बालविकास मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता अद्याप माहे एप्रिल, २०१७ अखेरपर्यंत झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१८) :** (१). नाही.

(२) मृत पावलेल्या मुलांच्या पालकांना भेटून त्यांना लोकनेता स्व. श्री. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान तर्फे प्रत्येकी रु.५१ हजाराची मदत घोषित केली होती. सदर रक्कम श्री गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यातिथीदिनी देण्यासाठी संबंधित बालकांच्या पालकांना निमंत्रित केले होते. तथापि संबंधित पालक न आल्याने त्यांचे धनादेश (क्रमांक ५०६६३६ व ५०६६३७, दिनांक ३.६.२०१७) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांच्यामार्फत पालकांना देण्यासाठी दिले होते. तथापि, श्रीमती चौधरी यांनाही मृत बालकांचे पालक भेटू शकले नाहीत त्यामुळे सदर धनादेश तालुक्याच्या गट विकास अधिकारी यांच्यामार्फत संबंधीत पालकांना वितरीत करण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयातील दुरवस्था

**(४) ८६१९५ (१६-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयात विविध विभागांतून संकलित करण्यात आलेला कचरा बर्न विभागाच्या पाठीमागे टाकण्यात येत असून तसेच ड्रेनेजचे पाणी व सांडपाणी रस्त्यावर आल्याने परिसरात दलदल सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त रुग्णालयात परिचारकांना सोयी सुविधांचा अभाव व एका परिचारिकेला २५ रुग्णांची सेवा करावी लागत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे. माहे मे,२०१७ मध्ये रूग्णालय परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काँक्रीटीकरणाच्या कामामुळे ड्रेनेज पाईप लाईन फटून पाणी साठले होते. तथापि कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कचरा कंटेनर उपलब्ध करून देण्यात आले असल्यामुळे दैनंदिन कचरा उचलण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

---

## औरंगाबादमधील घाटी रुग्णालयात औषधांच्या तुटवड्यांमुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय

**(५) ८७९५६ (१२-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबादमधील घाटी रुग्णालयात औषधांच्या तुटवड्यांमुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा मध्ये त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात औषधींचा तुटवडा होण्याची कारणे काय,

(३) असल्यास, तातडीने या रुग्णालयात औषधींचा पुरवठा करून रुग्णांची गैरसोय दूर करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) लागू नाही.

(३) उक्त संस्थेमध्ये रूग्णांच्या औषधोपचारासाठी लागणारी औषधे शासकीय दरकरारानुसार तसेच आवश्यकतेनुसार बी.एम.सी., ई.एस.आय.सी. यांच्या दरकरारावर व स्थानिक बाजारातून नियमाप्रमाणे दर पत्रके मागवून खरेदी करून रूग्णांना आवश्यकतेनुसार औषधांचा पुरवठा केला जातो.

(४) लागू नाही.

---

**नागपूर शासकीय वैद्यकीय रुग्णालयात मलेरियाच्या तपासणी बंद असल्याबाबत**

**(६) ८९३२८ (१६-०८-२०१७). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दोन महिन्यापासून मलेरियाच्या तपासणी बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास सदरहू तपासणीकरीता आवश्यक असलेली किट उपलब्ध नसल्याने रुग्णांचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, आजाराचे निदानच होत नसल्याने गोरगरिबांचे आरोग्य धोक्यात आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे मलेरिया या आजाराची चाचणी किट्स अभावी दि.१७/०१/२०१७ ते २३/०१/२०१७ (७ दिवस) पर्यंत मलेरियाच्या तपासण्या बंद होत्या. सद्यस्थितीमध्ये सदर चाचण्या पूर्ववत सुरू आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

---

**राज्यातील निवासी डॉक्टरांची सुरक्षा, निवासव्यवस्था व इतर बाबीसाठी उच्च स्तरीय समितीबाबत**

**(७) ९१३१२ (१६-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निवासी डॉक्टरांची सुरक्षा, निवासव्यवस्था व इतर बाबीसाठी एकच उच्च स्तरीय समिती असायला हवी तरच त्यांचे प्रश्न सुटतील असे मुंबई उच्च न्यायालयाने राज्य शासनाला निदेश दिल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) शासन निर्णय क्र.पीआयएल-२०१७/प्र.क्र.४०१/प्रशा-२, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ अन्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(३) लागू नाही.

---

**औरंगाबाद येथील शासकीय कर्करोग रुग्णालयात कंत्राटी कामगारांना कमी वेतन अदा केल्याबाबत**

**(८) ९१४२६ (२१-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय कर्करोग रुग्णालयात माहे जानेवारी, २०१२ पासून कंत्राटी कामगारांची विविध पदे भरती करण्याचे कंत्राट सुंदर कन्स्ट्रशन कंपनीने बनावट कागदपत्रे व कामगारांच्या सह्या वा अंगठे घेऊन रेकार्ड तयार केले असून कामगारांना माहे जानेवारी, २०१२ ते डिसेंबर, २०१६ या काळात एकूण ४७ लाख ८६ हजार रूपये कमी देऊन त्यांची फसवणूक केल्याची तक्रार झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने काही कामगारांचा पगार कामगार आयुक्तांनी ठरविल्या प्रमाणे ८ हजार रुपये न देता ३ ते ४ हजार रुपये देऊन कामगारांचे भविष्य निर्वाह निधीबाबतही अद्याप खुलासा केलेला नाही तसेच कामगारांच्या सुरक्षेची तरतूद न करता जादा कामाचे पैसे दिलेच नाही पण तक्रार केल्यावर कामगारांना माहे जाने.२०१७ पासून कामावरून काढून टाकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी कंपनी व संचालकांविरुद्ध कारवाई करण्याबाबत व कामगारांना परत कामावर घेऊन त्यांच्या देय रकमा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) लागू नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर वेकोली क्षेत्राली गोवरी गावाजवळील नाल्यावर बंधाऱ्याचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(९) ९३१३४ (२१-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर वेकोली क्षेत्राली गोवरी गावाजवळील नाल्यावर निधीअभावी मागील ११ वर्षापासून बंधाऱ्याचे बांधकाम अपूर्ण झाले असल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोवरी गाव बल्लारपूर वेकोली क्षेत्रातील मध्यवर्ती ठिकाणी असून खनिज निधी अंतर्गत कोणतीही विकास कामे करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळुन आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

खनिज विकास निधी अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील राजुरा व बल्लारपूर तालुक्यातील एकुण रु.३७७९.३७ लक्ष रकमेच्या १२६ कामांना प्र.मा. देण्यात आली असून सदर कामांकरिता महामंडळ व संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडून रु.२७१८.२८ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र दिनांक १८ सप्टेंबर, २००७ अन्वये सदरील को.प. बंधाऱ्याचे बांधकाम "जिल्हा खनिज प्रतिष्ठान" यांचे आराखडयात समाविष्ट करण्यात आलेला असून सुप्रमाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील लघु पाटबंधारे विभागात झालेला गैरव्यवहार

**(१०) ९४१७४ (२१-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील लघु पाटबंधारे विभागात झालेल्या गैरव्यवहाराची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-११-२०१८) :** (१) मौजे सरस ओहळ येथील लघुपाटबंधारे विभागाने बांधलेल्या बंधाऱ्याची कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, पालघर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(२) सदर कामाची क्षेत्रीय स्तरावर पाहणी केली असता व एकंदरित उपलब्ध लेखे पहाता कामात गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा शहरातील राणी बागेचे सुशोभिकरण करण्याबाबत**

**(११) ९६४२४ (३०-१२-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील (जि.बुलढाणा) राणी बगीच्यात जॉगिंग ट्रॅकसह बगीच्याचे सुशोभिकरण/सौंदर्यीकरण व संगम तलावामध्ये रंगीत संगितमय कारंजे (म्युझिकल फाउँटन) बसविणेबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतचा प्रस्ताव वन विभागाने तयार करुन माहे एप्रिल, २०१७ वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, बुलढाणा शहरातील राणी बगीच्यात जॉगिंग ट्रॅकसह बगीच्याचे सुशोभिकरण /सौंदर्यीकरण व संगम तलावामध्ये रंगीत संगितमय कारंजे (म्युझिकल फाउँटन) मंजुरीसह बसविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-१०-२०१८) :** (१) राणी बगीच्यात जॉगिंग ट्रॅकसह बगीच्याचे सुशोभिकरण / सौदर्यीकरणाची कामे करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

राणी बागेच्या लगत असलेला संगम तलाव हा नगर परिषदेच्या अखत्यारित असून या तलावाचे संवर्धन करण्यासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेच्या प्रस्तावाला शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत मान्यता मिळालेली आहे. परंतू सदर प्रस्तावामध्ये संगम तलावात रंगीत संगितमय कारंजे (म्युझिकल फाऊटॅन) या घटकांचा समावेश नाही.

(२) बुलढाणा वन विभागाकडून प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे सादर करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) बुलढाणा वन विभागाकडून राणी बगीच्यात जॉगिंग ट्रॅकसह बगीच्याचे सुशोभिकरण / सौदर्यीकरणाची कामे करण्याचे अनुषंगाने अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील शासकिय नर्सिंग महाविदयालयातील विदयार्थ्यांना ने आण करण्याकरिता वाहन वाढविण्याबाबत**

**(१२) ९६६०४ (२७-१२-२०१७). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकिय नर्सिंग महाविदयालयातील विदयार्थ्यांना ने आण करण्याकरिता एक वाहन असणे अनिवार्य आहे असे भारतीय परिचर्या परिषदेच्या नियमात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील नर्सिंग महाविद्यालयातील वाहन मागील १० ते १२ वर्षापासून तांत्रीक कारणामुळे बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त महाविदयालयाला वाहन किती कालावधीत उपलब्ध होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-१०-२०१८) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची बस तांत्रिक कारणामुळे असुरक्षित झाल्यामुळे निर्लेखित करण्यात आली आहे. शासकीय नर्सिंग महाविद्यालयाकरिता स्वत:ची बस उपलब्ध नाही.

सद्यस्थितीत भारत सरकारच्या निधीतून ओमनी ७+१ आसनी वाहन ऑक्टोबर २००२ मध्ये खरेदी केले आहे. मात्र सदर वाहन अपुरे पडल्यास शासकीय दंत महाविद्यालय, नागपूर यांच्या बसची मागणी करून विद्यार्थिनीना प्रशिक्षण ठिकाणी ने आण केली जाते.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याबाबत**

**(१३) १०१०५२ (०४-०१-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम नसल्याने नागरिकांना महत्त्वाच्या आरोग्यसेवेसाठी कायम गोवा राज्यात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात एक जिल्हा रुग्णालय, तीन उपजिल्हा रुग्णालये, सात ग्रामीण रुग्णालये आणि ३८ प्राथमिक आरोग्य केंद्र असूनही याचा नागरिकांना योग्य उपयोग होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-११-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

गंभीर रुग्णांना अतिविशिष्ट सेवांसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बांबोलीम, गोवा राज्य येथे संदर्भित करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये १ जिल्हा रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालये व ७ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित आहेत. याठिकाणी रेण्वीय निदान प्रयोगशाळेचे बांधकाम पुर्ण झाले असून त्यासाठी पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या प्रयोगशाळेकरीता उपकरणे व साधनसामुग्रीची खरेदी करण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये रु.१.१४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. याठिकाणी डीस्ट्रीक्ट वेअर हाऊस बांधण्यात आले आहे. सावंतवाडी व कणकवली येथील ट्रॉमा केअर युनिटकरीता कर्मचारी वर्ग मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. १०० खाटांच्या जिल्हा महिला व बाल रुग्णालयाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. देवगड येथील ५० खाटांच्या श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालयाकरिता मार्च, २०१७ ते २०१९ या आर्थिक वर्षामध्ये रु.४ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. वेंगुर्ला येथील ५० खाटांच्या श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालयाकरीता मार्च, २०१७ ते २०१९ या आर्थिक वर्षामध्ये रु.२.१० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा रुग्णालय सिंधुदूर्ग, उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी येथे डायलेसीस युनिट कार्यान्वित आहे. तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये १०० खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालय सुरु करण्यास दि.१७.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात परिचर्या महाविद्यालयीन शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबतची होत असलेली दिरंगाई**

**(१४) १०३९०० (२७-१२-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्याने सुरू केलेल्या बी.एस्सी (नर्सिंग) व एम.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी ५ परिचर्या प्रशिक्षण संस्थांमध्ये आवश्यक अध्यापकीय व अशैक्षणिक पद निर्मितीबाबत दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम व २ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार आणि आरोग्य विज्ञान विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरणाचे नुतनीकरण/विस्तारीकरण प्राप्त होण्यासाठी आवश्यक असणारी अध्यापकीय ४१ पदे व अशैक्षणिक ३ पदे निर्माण करण्यासाठी शासनाने मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार समिती गठित करण्यास मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या रिक्त पदांपैकी काही पदे अनुभवी व सेवाज्येष्ठता प्राध्यापकांमधून भरण्यात यावी या संबंधी गॅच्युएट नर्सेस टिचर्स असो. आॅफ महाराष्ट्र, नागपूर यासंघटनेद्वारा तसेच याबाबत नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी शासनास अनेकवेळा निवेदने दिले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्याने परिचर्या महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्यास विलंब होत असल्याने अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करून व संघटनेच्या मागणीचा विचार करून रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे?

**श्री. गिरीष महाजन (३१-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) परिचर्या प्रशिक्षण संस्थांमध्ये आवश्यक अध्यापकीय पदे भरण्यासाठी मा.कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे अक्ष्यतेखाली दि.०९.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेली समिती शासन शुध्दीपत्रक दि.२०.०३.२०१८ अन्वये सुधारित करण्यात आली असून, सदर पदे सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.१५.०७.२०१४ नुसार गठित करण्यात आलेल्या स्वतंत्र निवडमंडळामार्फत भरण्यास मान्यता दिली आहे.

---

**पुणे जिल्हा परिषदेत आरोग्य विभागांतील रिक्त पदे भरणेबाबत..**

**(१५) १०५३३८ (३१-०३-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेत आरोग्य विभागांतर्गत जिल्हा आरोग्य अधिकारी वर्ग १, तालुका आरोग्य अधिकारी वर्ग-२ गट अ, वैद्यकिय अधिकारी वर्ग २- गट अ व वैद्यकिय अधिकारी वर्ग २ गट-ब, व वर्ग ३ व वर्ग ४ मधील दिनांक ३१ डिसेंबर २०१७ अखेर किती पदे मंजूर होती व त्यापैकी किती पदे भरण्यात आली आहेत व अद्याप किती पदे रिक्त आहेत,

(२) असल्यास, उक्त अ ते ड संवर्गातील पदे रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-११-२०१८) :** (१) पुणे जिल्हा परिषदेतंर्गत गट-अ ते गट-ड संवर्गातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे आहे. :-

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा आरोग्य अधिकारी (गट-अ) | १ | १ | ० |
| २. | तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ) | १३ | ३ | १० |
| ३. | वैद्यकीय अधिकारी (गट-अ) | १८७ | १४९ | ३८ |
| ४. | वैद्यकीय अधिकारी (गट-ब) | २९ | २५ | ४ |
| ५. | आरोग्य सेवक महिला | ९३२ | ५७३ | ३५९ |
| ६. | आरोग्य सेवक पुरुष | ४६१ | २४ | २१७ |
| ७. | आरोग्य पर्यवेक्षक | १९ | १३ | ६ |
| ८. | औषध निर्माण अधिकारी | १११ | ९६ | १५ |
| ९. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ९ | ७ | २ |
| १० | कुष्ठरोगतज्ञ | २ | २ | ० |
| ११ | अवैद्यकीय पर्यवेक्षक | १ | १ | ० |
| १२ | आरोग्य सहा. महिला | १०० | ८५ | १५ |
| १३ | आरोग्य सहा, पुरुष | १५९ | १४१ | १८ |
| १४ | छायाचित्रकार | १ | ० | १ |
| | एकूण (गट-अ ते गट-ड ) | २०२५ | १३४० | ६८५ |

(२) बहुतांश अधिकारी/कर्मचारी त्यांच्या निवासी स्थायीक असलेल्या ठिकाणापासून अत्यंत दूरवरच्या ठिकाणावर ग्रामीण आदिवासी व दुर्गम भागात काम करण्यास इच्छिक नसतात. गट-ड ची पदे ग्रामविकास विभागाकडून भरलेली नाहीत.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याकरिता संचालनालयाच्या स्तरावरुन सर्व जिल्हाधिकारी यांना पदे भरण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

गट-क संवर्गातील पदभरतीस ग्रामविकास विभागाकडून २०१६ पासून मान्यता नसल्यामुळे रिक्त पदे भरण्यात आलेली नाहीत. तथापि, एनएचएम/आयपीएच मार्फत अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण ८२७ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जेरियाट्रीक सेंटर सुरु करण्याबाबत**

**(१६) १०६०११ (०४-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात येथे ३० खाटांचे जेरियाट्रीक सेंटर सुरु करण्यास केंद्रिय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने एक वर्षापूर्वीच मंजुरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या उदासीन धोरणामुळे वर्षभर याकडे दुर्लक्ष केल्याने सदर काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (३१-१०-२०१८) :** (१) होय

(२) हे खरे नाही, याविषयी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे “विभागीय जिरॅयाट्रिक केंद्र” स्थापन करणेबाबतचा शासन निर्णय दिनांक १७.०९.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३)व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे भरतपाढा (ता.तलासरी जि.पालघर) येथील काटकरी कुटूंबातील मुलाचा मृत्यूबाबत**

**(१७) १०६४४१ (०७-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भरतपाढा (ता.तलासरी, जि.पालघर) येथील कातकरी कुटूंबातील कु. स्वप्नील मंगेश मुकने या आदिवासी मुलाचा दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच आदिवासी मुलांचे मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (३०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

कु.स्वप्नील मंगेश मुकने या आदिवासी मुलाचा दिनांक २७/११/२०१७ रोजी सामान्य रुग्णालय, सिल्वासा येथे मृत्यू झालेला होता.

(२) कु.स्वप्नील यास दिनांक २६-११-२०१७ रोजी आकडी आल्याने ग्रामीण रुग्णालय, तलासरी येथून संदर्भीत करण्यात आले. या बालकावर उपजिल्हा रुग्णालय, खानवेल तसेच सिल्वासा येथील सामान्य रुग्णालयामध्ये उपचार करण्यात आला. तथापि उपचारा दरम्यान बालकाचा मृत्यू झाला. बालकाच्या मृत्यूचे कारण Broncho pneumonia हे आहे.

(३) तलासरी येथील संबंधीत वैदयकिय अधिकारी यांना याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

आदिवासी मुलांचे मृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत

उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे आजारी बालकांसाठी विशेष नवजात काळजी कक्ष, तालुकास्तरावर नवजात स्थिरीकरण कक्ष, प्रसूती गृहात नवजात काळजी कोपरा, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, अतिसार नियंत्रण पंधरवडा, आशा व आरोग्य कर्मचा-यांमार्फत गृहभेटी, जास्त अर्भक मृत्यूदर असलेल्या गावांमध्ये आशांमार्फत तपासणी व उपचार, मानव विकास कार्यक्रमांतर्गत बालरोग तज्ञांकडून तपासणी, नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत गावामध्ये सर्व माता व बालकांचे तपासणी व उपचार, मुंबई येथील खाजगी रुग्णालयातील तज्ञांमार्फत आरोग्य तपासणी व उपचार करण्यात येतात.

(४) प्रश्न उदभवत नाही

---

## पुणे शहरातील ससून रुग्णालयात दोन वर्षाच्या मुलावर शस्त्रक्रिया करण्यात आल्यानंतर त्याची एक किडनी गायब झाल्याची तक्रार

**(१८) १०६८०९ (०७-०४-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ससून रुग्णालयात भोसरी (पुणे) येथील युनुस चांद तांबोळी यांच्या दोन वर्षाच्या मुलावर शस्त्रक्रिया करण्यात आल्यानंतर त्याची एक किडनी गायब झाल्याची तक्रार त्याच्या पालकांनी ससून रुग्ण प्रशासनाकडे तसेच भारतीय मानव अधिकार परिषदेकडे केल्याची बाब दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालय प्रशासनाने या प्रकरणी चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा अहवाल ससून रुग्णालय तसेच शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१) पालकांनी दि.०९/१२/२०१७ रोजी रूग्णालय प्रशासनाकडे व दि.१४/१२/२०१७ रोजी भारतीय मानव अधिकार, पुणे यांचेकडे तक्रार दाखल केली आहे.

(२) व (३) होय.

(४) समितीच्या अहवालानुसार सदर रूग्णाच्या सी.टी.युरोग्राफी चाचणीमध्ये दोन्ही किडण्या अस्तित्वात असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून न आल्याने सदर प्रकरणी कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

---

**नागपूर शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व डागा स्मृती रुग्णालय येथे प्रतिबंधात्मक लसीचे केंद्र निर्माण करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१९) १०६९२१ (०७-०४-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व डागा स्मृती रुग्णालय येथे प्रतिबंधात्मक लसीचे केंद्र निर्माण होणाऱ्या प्रस्तावाला कैंद्रिय आरोग्य मंत्रालयाने मंजुरी अद्यापपर्यंत दिली नसल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात लसी केंद्रासाठी प्रशिक्षण दिलेल्या दोन्ही डॉक्टरांच्या बदल्या इतरत्र करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासन सदर लसी केंद्राच्या निर्मिती करीता उदासीन असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाच्या मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

---

**वडाळी (जि.अमरावती) येथील बांबू उद्यानाच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(२०) १०६९९५ (०७-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळी (जि.अमरावती) येथील बांबू उद्यानातील आर्थिक गैरव्यवहार व टॉयट्रेन विना परवाना चालविणाऱ्या वनपाल व वरिष्ठ दोषी अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन निलंबीत करण्याची मागणी जनकल्याण कृती समितीने प्रधान मुख्य वन संरक्षकाकडे केली असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-११-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) बांबू वनउद्यानातील रस्ते कामाबाबत तक्रार प्राप्त झाली होती. सदर रस्त्याची तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांचेकडून करण्यात आलेली असून तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी वडाळी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रक्रिया सुरु केली आहे. बांबू वनउद्यानात बांबू ट्रेनचा अपघात दिनांक २६.११.२०१७ रोजी झाला होता. सदर प्रकरणामध्ये दिनांक २६.११.२०१७ रोजी एफ.आय.आर. नंबर ९२९ अन्वये भारतीय दंड संहिता १८६० धारा २७९, ३३६, ३५८ अन्वये बांबू ट्रेनचे चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

---

**चंद्रपूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या सफारीसाठी सफारी शुल्कात केलेली वाढ**

**(२१) १०८१७४ (१०-०४-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्याघ्रदर्शनासाठी जगप्रसिध्द असलेल्या चंद्रपूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या सफारीसाठी सफारी शुल्क ५ टक्क्यांनी वाढविले असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर सफारीसाठी शनिवार व रविवार या दिवशी ८ हजार तर इतर दिवशी ४ हजार शुल्क त्याशिवाय जिप्सीचा खर्च कमीत कमी २ हजार तर गाइडचा खर्चही वेगळा त्यामुळे ताडोबातील एका पर्यटनवारीसाठी दहा हजारांहून अधिक खर्च येणार असल्याने हा खर्च सर्वसामान्यांना परवडणारा नसल्याने ते वंचित रहणार असल्याची शक्यता
वर्तविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रवेश शुल्क दरवाढ करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, लागू करण्यात आलेल्या नव्या दराबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१८) :** (१), (२), व (३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटनाकरीता येणाऱ्या पर्यटकांसाठी प्रवेश शुल्क पूर्वीप्रमाणेच प्रति जिप्सी रु. १,०००/- (रुपये एक हजार) ठेवण्यात आले आहे. मात्र शनिवार व रविवार पर्यटकांची गर्दी व सोडण्यात येणाऱ्या वाहनांची संख्या लक्षात घेता महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएपली ११.१७/प्र.क्र.२८९/फ-१, दिनांक :- ०८.०१.२०१८ अन्वये दिनांक ०१.०२.२०१८ पासून शनिवार व रविवार या दोन दिवशी प्रवेश शुल्क रु. २,०००/- (रुपये दोन हजार) ठेवण्यात आले आहेत. हे दर आरक्षण करण्याच्या दिवासांपासून ६० दिवसापर्यतचे कालावधीकरीता लागु आहेत.

६० दिवसा पेक्षा अधिक ते १२० दिवसापर्यत प्रती सफारीचे प्रवेश शुल्क रु. ४,०००/- (रुपये चार हजार) व शनिवार व रविवार या दोन दिवशी प्रवेश शुल्क रु. ८,०००/- (रु. आठ हजार) ठेवण्यात आलेले आहेत.

तसेच रेल्वेच्या धर्तीवर अंतीमक्षणी आरक्षण करणाऱ्या पर्यटकांना पर्यटनासाठी तत्काल आरक्षण सेवा उपलब्ध केली असून त्याचे प्रवेश शुल्क रु. ४,०००/- (रुपये चार हजार) प्रती वाहन प्रती फेरी आहे.

शनिवार व रविवारी येणा-या पर्यटकांची वाढ व प्रवेशव्दारातून सोडण्यात येणा-या वाहनाची संख्या बघता, पर्यटन सुरळीतपणे व सर्वसाधारण पर्यटकांना पर्यटनाची संधी उपलब्ध व्हावी याकरिता प्रवेश शुल्कात बदल करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुर्डूवाडी (ता.माढा जि.सोलापूर) येथील ट्रामा केअर युनिटचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२२) १०८३०० (०१-०४-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) या ठिकाणी ट्रामा केअर युनिट मंजूर झालेले असून त्यांचे कामाची सुरवात अद्यापपर्यंत झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुर्डूवाडी हे नगरपालिकेचे ठिकाण असून रेल्वे जंक्शन तसेच राष्ट्रीय व राज्य मार्गावरील शहर असल्याने त्या ठिकाणी ट्रामा केअर युनिट करण्याची मागणी अनेक दिवसापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ट्रामा केअर युनिट चालु करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०५-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर ट्रामा केअर युनिट बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत (जीवनदायी) गरीब रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२३) १०९६०० (०५-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत (जीवनदायी) गरीब रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत प्रशासन, रुग्णालय व अधिकाऱ्यांना माहिती असतानाही त्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०८-१०-२०१८) : (**१) नागपूर जिल्हयामध्ये दि. २१.११.२०१३ ते दि.७.०५.२०१८ या योजनेच्या कालावधीत विविध प्रकारच्या एकूण २०२ तक्रारी नोंदिवण्यात आल्या असून त्यापैकी १४८ तक्रारींचे निराकरण राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून करण्यात आले असून उर्वरित तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

(२), (३) व (४) विमा कंपनीद्वारे चौकशी करण्यात आलेली आहे. विमाकंपनीकडून प्राप्त चौकशी अहवालाच्या आधारे अंगीकरण समितीच्या बैठकीमध्ये टि.पी.ए. (थर्ड पार्टी ॲडमिनिस्ट्रेटर) मार्फत योजनेंतंर्गत नागपूर जिल्हयातील रूग्णांकडून अधिक पैसे घेतल्याच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर मेडीट्रीना रूग्णालयास कारणे दाखवा नोटीस पाठवून त्यानंतर सदर रूग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात आले व आशा रूग्णालयास तक्रारींबाबतचे स्पष्टीकरण देण्यासाठी टी.पी.ए.मार्फत नोटीस पाठविण्यात आली आहे. तसेच योजनेच्या लाभार्थ्यांना चुकीची माहिती दिल्यामुळे शत-आयु रूग्णालयास कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली आहे.

रूग्णांकडून विवीध प्रकारच्या प्राप्त तक्रारीच्या पार्श्वभूमीवर पुढील ४ रूग्णालयांना तक्रारीबाबतचे स्पष्टीकरण देण्यासाठी टी.पी.ए. मार्फत नोटीस पाठविण्यात आलेली आहे.

१) श्री.क्रिष्ण हृद्यालय रूग्णालय, जि.नागपूर

२) महात्मे आय बँक रूग्णालय,जि.नागपूर

३) नॅशनल कॅन्सर रूगणालय, जि.नागपूर

४) मोगरे चिल्ड्रन्स रूग्णालय, जि.नागपूर

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत**

**(२४) ११०५१४ (३१-०३-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात सद्या रक्ताचा तुटवडा असून सिव्हील रक्तपेढीमध्ये गरजूंना रक्तपुरवठा करण्यासाठी समस्या निर्माण् होत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या रुग्णालयातील रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१) खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) लागू नाही.

---

**राज्यातील एनआरएचएम अंतर्गत येणाऱ्या आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करण्याबाबत**

**(२५) ११०८८१ (१०-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एनआरएचएम अंतर्गत येणाऱ्या आरोग्य विभागात आयुष वैद्यकीय अधिकारी हे गेल्या आठ ते दहा वर्षापासून कंत्राटी पध्दतीने कार्यरत असून त्यांना नाममात्र वेतन मिळत असल्याने या सर्व कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना आरोग्य सेवेत कायम करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीसह कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संघटनेनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेत काम करण्यासाठी एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे आयुष वैद्यकीय अधिकारी सेवेत कार्यरत असल्याने ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांना इतर राज्याच्या तुलनेत कमी वेतन देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंत्राटी आयुष्य वैद्यकीय अधिकारी यांना शासकीस सेवेत कायम करून सुधारित वेतन श्रेणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (३०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अशत: खरे आहे.

वैद्यकीय अधिका-यांना काही राज्यांमध्ये जास्त तर काही राज्यांमध्ये महाराष्ट्रातील वैद्यकीय अधिका-यांएवढे किंवा त्यांच्यापेक्षा कमी (उदा. पश्चिम बंगाल) वेतन देण्यात येते.
(४) कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना शासकीय सेवेत कायम करण्यासंदर्भात मा. मंत्री स्तरावर त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणी केलेल्या मुलांच्या शस्त्रक्रिया व दुर्धर आजार उपचार राज्य आयोग हमी सोसायटीच्या अंगीकृत रुग्णांलयांमार्फत करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२६) १११५१४ (०१-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणी केलेल्या मुलांच्या शस्त्रक्रिया व दुर्धर आजार उपचारांसाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य सोसायटीच्या सहयोगाने अंगीकृत रुग्णालयांद्वारे करण्यात येत होत्या त्या यापुढे विमा कंपनीचा सहभाग न घेता राज्य आयोग हमी सोसायटीच्या अंगीकृत रुग्णालयांमार्फत करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याअंतर्गत कोणकोणत्या आजारांवर व कोणत्या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्तबाबत सेवा शुल्क आकारले जाणार आहे काय?

**डॉ. दीपक सावंत (३०-१०-२०१८) : (**१) होय, हे खरे आहे.

राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी सोसायटी स्थापन करण्यात आली होती. परंतू सदर योजनेचे नाव महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना असे बदलण्यात आल्याने राजीव गांधी जीवनदायी सोसायटीचे नाव बदलून राज्य आरोग्य हमी सोसायटी असे करण्यात आले आहे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत पथकांमार्फत करण्यात येणा-या बालकांच्या शस्त्रक्रिया व दूर्धर आजारांवरील उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत राज्य आरोग्य हमी सोसायटी अंगीकृत रूग्णालयाद्वारे करण्यात येतात.
(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांन्वये केशरी व पिवळे रेशनकार्ड धारकांसाठी एकूण १०४ शस्त्रक्रियांपैकी ३६ शस्त्रक्रिया ह्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत संलग्न रूग्णालयातून करण्यात येतात. उर्वरीत ६८ शस्त्रक्रिया ह्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत मंजुर अनुदानातून करण्यात येतात.

(३) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत येणा-या १०४ शस्त्रक्रियांपैकी ३६ शस्त्रक्रियांचा खर्च हा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत करण्यात येतात. त्याचप्रमाणे उर्वरीत ६८ शस्त्रक्रियांचा खर्च हा केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या दरांनुसार राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत मंजुर अनुदानातून करण्यात येतात. यासाठी सेवा शुल्क आकारण्यात येत नाही.

---

**सामाजिक वनीकरण विभाग वनविभागात समाविष्ट करण्याचा निर्णय**

**(२७) १११९३८ (३१-०३-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक वनीकरण हा विभाग वन विभागात समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, प्रस्तावित एकत्रीकरणानंतर सामाजिक वनीकरण विभागाची महत्वाची पदे कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्याचे काम सामाजिक वनीकरण विभागामार्फत होत असल्यामुळे सामाजिक वनीकरण विभागात असलेली सर्व पदे कायम ठेवावीत तसेच महसूल विभागांमार्फत असणारी सामाजिक वनीकरणाची सर्व कार्यालये मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे नियंत्रणाखाली आणावीत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-१०-२०१८) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) वन विभागाच्या सुधारीत आकृतिबंधामध्ये सामाजिक वनीकरण विभागासाठी सध्याच्या पदांव्यतिरिक्त अतिरिक्त १०२३ पदे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. याव्यतिरिक्त प्रादेशिक वन विभागाकडील मंजूर पदांचा आढावा घेवून सामाजिक वनीकरण शाखेचे बळकटीकरण करण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिका-यांची ३३ पदे, वनरक्षकांचे १६७ व वनपालांचे ७१ पदे सामाजिक वनीकरण विभागास वर्ग करण्यात आलेले आहे.

वनविभागाच्या शासन निर्णय दिनांक ३१.०३.२०१७ अन्वये सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत वनवसंरक्षक सामाजिक वनीकरण वृत्त कार्यालये ही मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या नियंत्रणाखाली आणण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रुग्णालयाचे खाजगीकरण करण्याचा निर्णय**

**(२८) ११३४८३ (१०-०४-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३०० किंवा त्यापेक्षा जास्त खाटा असणाऱ्या शासकीय रुग्णालयांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब निदर्शानास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३०० खाटाचे रुग्णालये व त्या अंतर्गत वैद्यकीय महाविद्यालय सुरु करून ते पीपीपी तत्वावर चालवण्यासाठी दिली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अंमलबजावणी झाल्यास जिल्हा रुग्णालयाच्या नि:शुल्क व माफक दरातील वैद्यकीय सुविधांपासून सर्वसामान्य रुग्ण वंचित रहाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१२-१०-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

---

**मौजे सात्राळे (ता. दिंडोरी, जि.नाशिक) गावातील प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याच्या आदेशाबाबत**

**(२९) ११५२८३ (१०-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सात्राळे (ता. दिंडोरी, जि.नाशिक) गावातील १० शेतक-यांची सुमारे १० एकर जमीन पाझर तलावासाठी जिल्हा परिषदेच्या लघू पाटबंधारे विभागाने संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतक-यांना बाजारभावाप्रमाणे जमीनीचा मोबदला अदा करण्यात न आल्याने उक्त शेतकऱ्यांनी न्यायालयात नुकसान भरपाईसाठी दाखल केलेल्या दाव्याचा निकाल सन २००९ मध्ये न्यायालयाने देऊन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना बाजार भावाप्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या लघू पाटबंधारे विभागाकडून सन २०१५ पर्यंत कोणतीच नुकसान भरपाई देण्यात न आल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने न्यायालयाने कार्यकारी अभियंत्यांची खुर्ची जप्त करण्याचे आदेश माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना बाजार भावाप्रमाणे जमीनीचा मोबदला देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-११-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

साद्राळे, ता.दिंडोरी येथील पाझर तलाव क्र.२ साठी ५ शेतकऱ्यांची २.५५ हेक्टर जमिन संपादीत करण्यात आली आहे.

(४) सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे. सुधारीत प्र.मा. प्राप्त झाल्यानंतर निधीची तरतुद करण्यात येऊन न्यायालयाच्या आदेशानुसार शेतकऱ्यांना वाढिव मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल, तथापि, माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये शेतकऱ्यांना खाते प्रमुख अग्रिम मधून उचल देऊन रक्कम रु.४,६४,०००/- न्यायालयात जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय नर्सिंग महाविद्‌यालयात शिकणाऱ्या विद्‌यार्थिनींना राज्य शासन व महानगर पालिका क्षेत्रातील रुग्णालयांमध्ये देण्यात येणारे विद्‌यावेतनात वाढ करणेबाबत**

**(३०) ११५६५३ (०५-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय नर्सिंग महाविद्‌यालयात शिकणाऱ्या विद्‌यार्थिनींना राज्य शासन व महानगर पालिका क्षेत्रातील रुग्णालयांमध्ये देण्यात येणारे विद्‌यावेतन समान नसून ते अत्यल्प असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शसान आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या परिचारकांना देण्यात येणाऱ्या विद्‌यावेतनाबाबत वाढ करण्यासह शासकीय व महानगर पालिका रुग्णालयांमध्ये विद्‌यावेतनाची रक्कम समान करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-१०-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) या स्वरूपाचा कोणताही प्रस्ताव या विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तळजाई (जि.पुणे) येथील टेकडीवर झालेल्या अतिक्रमणांमुळे वृक्षसंपदेला धोका निर्माण झाल्याबाबत**

**(३१) ११६६९५ (३१-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळजाई (जि.पुणे) येथील टेकडीवर बांधकाम साहित्य व बांधकाम झाल्यानंतरचे उर्वरित साहित्य टाकण्यात येत असून तेथे बांधकाम व्यावसायिकांनी केलेल्या अतिक्रमणांमुळे तेथील वृक्षसंपदेला धोका पोहचत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, तळजाई टेकडीचा काही भाग वन विभागाकडे काही भाग महापालिकेकडे असून वन विभागाकडील सर्व वन क्षेत्र संरक्षित असतांना त्या ठिकाणी मानवी हस्तक्षेप वाढत असून महापालिका आणि वन विभाग प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हेही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार तळजाई येथिल टेकडीवर होणारे अतिक्रमण रोखण्यासह याकडे दूर्लक्ष करणा-या महापालिका व वन विभागाच्या अधिकारी व कर्मचा-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मौजे पाचगाव पर्वती, तळजाई टेकडीवर बांधकाम व्यावसायिकांकडून बांधकामाचे साहित्य व बांधकाम झाल्यानंतरचे उर्वरित साहित्य इ. वन क्षेत्र हद्दीमध्ये टाकण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) तळजाई टेकडी, मौजे पाचगाव पर्वती स.नं. १ चे एकूण २३९.६८ हे.आर क्षेत्र राखीव वनक्षेत्र असून सदरचे क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे. टेकडीचा उर्वरित भाग हा पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या मालकीचा असून त्यांच्या ताब्यात आहे.

वन विभागाच्या ताब्यात असणाऱ्या क्षेत्राच्या संरक्षणाचे काम वन विभागाकडून करण्यात येत आहे. सदर वन क्षेत्राच्या संरक्षणार्थ स्थानिक जनतेचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने नागरी वनसंरक्षण समितीच्या सहभागाने नागरी वन उद्यान निर्मितीबरोबरच नागरी संयुक्त वनव्यस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

(३) पुणे वन विभागातील वनक्षेत्रावरील अतिक्रमण हटविण्यासाठी भारतीय वन अधिनियम, १९२७ व वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अन्वये कार्यवाही करण्यात येत असून शहरी तसेच ग्रामीण वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासन करण्याची कार्यवाही टप्प्या टप्प्याने पोलीस, एस.आर.पी.एफ व वन विभाग यांच्या मदतीने सुरु आहे.

पुणे वन विभागाच्या वनक्षेत्रामध्ये होणाऱ्या अतिक्रमणास आळा घालण्याकरिता शहरातील अतिसंवेदनशील वनक्षेत्राभोवती सिमाभिंत बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळंबस्ते (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी) येथील शासकीय जागेवरील खैराच्या वृक्षांची झालेली अवैध तोड**

**(३२) ११६७९५ (०४-०८-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबस्ते (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या आवारातील शासकीय जागेवर असलेली खैराची पाच झाडे विनापरवाना तोडून त्यांची परस्पर विक्री करण्यात आल्याचे माहे मार्च-एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेस तीन महिने होऊनसुध्दा या प्रकरणातील संबंधितांवर अदयाप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी वनपाल चिपळूण यांनी दिनांक १८.४.२०१८ अन्वये खैर मालाचे विनापरवाना वाहतुकीबाबत भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१ (२) (ब) अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे. तसेच खैर माल नग-१६/०.३८९ घ.मी. जप्त केला आहे. त्याचप्रमाणे सदर गुन्हयात डॉ.एस.एन.निमुणकर, पशुधन विकास अधिकारी, सघन कुक्कुट गट, कळंबस्ते यांचेविरुध्द खैर वृक्ष प्रजातीचे विनापरवाना तोडीसाठी वृक्ष अधिकारी तथा परिक्षेत्र वन अधिकारी, चिपळूण यांनी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४ सुधारणा सन १९८९ चा अधिनियमाच्या कलम ३ चा भंग झाल्याने कलम ४ अन्वये विनापरवाना वृक्षतोड प्रकरणी दंडात्मक कारवाई केली आहे.

---

**मौजे शिवापूर (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत श्रीरामनगर येथील वनक्षेत्रावरील वन उद्यानाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) ११६८४५ (३०-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवापूर (ता.हवेली, जि.पुणे )अंतर्गत श्रीरामनगर येथील राखीव वन गट नं.३०८ व ३०९ या वनक्षेत्रावरील वन उद्यानाचे काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदरच्या वनक्षेत्रावर उद्यान विकसित करण्याची मागणी त्या भागातील ग्रामस्थांकडून वारंवार होत असून या उद्यानाच्या कामाला गती येण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधीनी तसेच संबंधित ग्रामपंचायत यांनी मा.वनपरिक्षेत्र अधिकारी, पुणे. यांना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पत्र व लेखी निवेदन दिले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू उद्यानासाठी संबंधित ग्रामपंचायतींकडून सर्वोतोपरी सहकार्य केले जाणार असून स्थानिक लोकप्रतिनीधीसुध्दा त्याच्या विकास निधीतून निधीची उपलब्धता करून देत असल्याचे कळविले असतांनाही संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजे शिवापूर, श्रीरामनगर येथील राखीव वन गट नं.३०८ व ३०९ या वनक्षेत्रावर अद्यावत वन उद्यान विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१८) :** (१) व (२) सदरच्या वनक्षेत्रावर उद्यान विकसित करण्याची मागणी त्या भागातील ग्रामस्थांची व लोकप्रतिनिधीची आहे.

(३), (४) व (५) मौजे शिवापूर (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत श्रीरामनगर येथील राखीव वन गट नं.३०८, ३०९ व ३१० या ठिकाणचा निसर्ग पर्यटनांचे कामाचा ३ वर्षांचा आराखडा रक्कम रु.१०२.०८ लक्षचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, सदर प्रस्तावानुसार बाबनिहाय अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही वनपरिक्षेत्र अधिकारी, पुणे यांचेकडून सुरु आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी सदर ठिकाणी उंच रोपांची लागवड करण्याकरीता त्यांचे विकास निधीतून रु.२.५० लक्ष इतक्या निधीची तरतूद केली आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या प्रस्तावाबाबत

**(३४) ११६९१४ (०१-०८-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा माहे मे वा जून, २०१८ मध्ये घेण्याचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाने तयार करावा असे आदेश मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव विभागाने तयार करुन शासनाची मान्यता घेतली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने या प्रस्तावाच्या अंमलबजावणी संदभर्सतील सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या अनुषंगाने शासनामार्फत विद्यापीठास निर्देश देण्यात आले होते. विद्यापीठाने संस्थेस परीक्षा अर्ज विलंबाने सादर केल्याच्या कारणास्तव विलंब शुल्क आकारुन विद्यार्थ्यांना उन्हाळी सत्र २०१८ परीक्षेस बसण्यास परवानगी दिली. सदर विद्यार्थ्यांचे निकालही घोषित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवना (ता.येवला, जि.नाशिक) सिंचन प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत**

**(३५) ११७५५० (२०-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवना (ता.येवला जि.नाशिक) सिंचन प्रकल्पाच्या सर्वसाधारण आराखड्यास सक्षम स्तरावरून मान्यता देण्यात येवूनही सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल माहे मे २०१८ पर्यंत शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,गिरणा नदी खोरे प्रकल्प विभागाने शासन निर्णय दि ३१ मे २०१७ अन्वये दि १८ जानेवारी रोजी देवना सिंचन प्रकल्पाचे सर्व दस्तऐवज लघुसिंचन विभाग नाशिक यांना हस्तांतरित केले आहे ,हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाकडे प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्याची लोकप्रतिनिधींनी दि १ मार्च २०१८ रोजी वा त्या सुमारास अधीक्षक अभियंता, जलसंधारण (लघुसिंचन) मंडळ नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्याबाबत जलसंधारण मंडळाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-१०-२०१८) :** (१) साठवण तलाव देवना, ता.येवला ची सिंचन क्षमता ६०० हेक्टरपेक्षा कमी असल्याने दिनांक १८/१/२०१८ रोजी जलसंधारण विभाग, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३) हे अंशत: खरे आहे. कपात सुचना क्र.६ अन्वये मा.विधानसभा सदस्य यांनी मागणी केलेली होती.

(४) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्याकडून योजनेच्या माती धरणाच्या काटछेदाचे संकल्पन प्राप्त झालेले आहे. सदर काटछेद संकल्पनानुसार सन २०१७-१८ च्या दरसुचीनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल दि.७/०८/२०१८ रोजी मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे यांना सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महालखेडा (ता.येवला जि.नाशिक) येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे काम बंद असल्याबाबत**

**(३६) ११७५५३ (२३-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालखेडा (ता.येवला जि.नाशिक) येथील कोल्हापूर बंधाऱ्याचे माहे ऑगस्ट २०१२ मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्यात आलेले काम माहे जानेवारी, २०१८ पर्यंत पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम माहे जून २०१५ पासून बंद पडलेले असून हे काम त्वरित सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी दि १० मे २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंधारण मंत्री, कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता लघुसिंचन विभाग यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, महालखेडा येथील कोल्हापूरी बंधा-याचे काम त्वरीत सुरु करण्यासह सदर कामात दिरंगाई काणा-यावर संबधित अधिका-यावर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (१३-११-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) महालखेडा योजनेचा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडे सादर करण्यात आला असून प्रस्तावाची तपासणी करुन सुधारित प्र. मा. देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित खाजगी आयुर्वेद आणि युनानी महाविद्‌यालयातील अध्यापकांच्या रिक्त पदांसंदर्भात**

**(३७) ११७८६८ (०१-०८-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित खाजगी आयुर्वेद आणि युनानी महाविद्‌यालयातील अध्यापकांच्या सरळसेवेच्या रिक्त पदांच्या भरती संस्था आणि महाविद्‌यालयाने करावयाची नाही असे धोरण शासनाने स्विकारले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाविरोधात संस्थाचालकांनी शासनाकडे तक्रार केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय व त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. प्रकरणी सदर अध्यापकीय पद भरती प्रक्रिया शासनाकडून सुरु करुन राबविण्यापूर्वी खाजगी शासन अनुदानित संस्थेतील अध्यापकांनी त्यांना विभागीय पदोन्नती समितीमार्फत पदोन्नती देण्याबाबत परस्पर शासनाकडे व संस्थाचालकांचे प्रतिनिधी (प्र.प्राचार्य) मार्फत संचालनालयाकडे विविध निवेदने सादर केली होती. तद्‌अनुषंगाने याप्रकरणीची वस्तुस्थिती संचालनालयाचे दि. २८.०३.२०१८ रोजीचे पत्रान्वये संबंधित महाविद्‌यालयांचे प्रभारी प्राचार्य, अध्यक्ष/सचिव यांना यथोचितरित्या अवगत करुन, त्याबाबत शासनासही कळविण्यात

आले होते. तथापि, सदर अनुदानित महाविद्यालयातील क.व्यं.ता.र.आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी महाविद्यालयाने व उर्वरित सर्व महाविद्यालयांनी (प्रतिनिधी स्वरुपात) शासन स्तरीय निवड मंडळामार्फत अनुदानित संस्थेतील पद भरती प्रक्रियेचे विरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे न्या.या.क्र.९६६२/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिकेची सुनावणी दि. १८.०६.२०१८ रोजी झाली आहे. सदर सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने सदर महाविद्यालयाची व त्यांचे वतीने दाखल केलेल्या अन्य महाविद्यालयातील शिक्षक पद भरती करु नये असे निर्देश दिले आहेत. सदर न्या.याचिकेची पुढील सुनावणी दि. ३०.०८.२०१८ रोजी होती.

तसेच रा.तो.आयुर्वेद महाविद्यालय, अकोला या अनुदानित महाविद्यालयाची जनक संस्था राष्ट्रीय वैद्यक प्रसारक मंडळ यांनी त्यांचे महाविद्यालयातील अध्यापकीय पद भरतीबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे न्या.या.क्र. ४४३७/२०१७ दाखल केली होती. सदर याचिकेची सुनावणी दि. ०८.०१.२०१८ रोजी होऊन, शासन निर्णय दि. २८.०८.२०१७ अन्वये शासन अनुदानित खाजगी आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील पदे निवड मंडळामार्फत भरणेसाठी स्थापन केलेल्या शासन स्तरीय निवड मंडळाची कार्यपध्दती, कार्यकक्षा व अधिकार तसेच अध्यापकीय संवर्गातील पदांसाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता निकष व कार्यपध्दतीबाबत निर्णय शासनाने दोन महिन्यांचे आत घ्यावा. तसेच सदर निर्णय घेतल्यापासुन याचिकादार महाविद्यालयात सहा आठवडयांचे आत किंवा जास्तीस जास्त दोन महिन्यांचे आत अध्यापकांची नियुक्ती करावी असा मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी निर्णय दिला आहे. त्यानुसार शासनाने शासन निर्णय दि. २२.०१.२०१८ अन्वये शासन स्तरीय निवड मंडळाची कार्यकक्षा व अधिकार निश्चित केले आहेत. परंतु न्या. निर्णय दि. ०८.०१.२०१८ चे सदर निर्णयाचे विरोधात रा.तो.आयुर्वेद महाविद्यालय, अकोला यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका (सिव्हील) क्र.१०८५७/२०१८दाखल केली आहे. त्यानुसार सदर न्या.याचिका मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(३) उपरोक्त न्या.याचिका प्रकरणी शासनाची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी व अनुदानित संस्थेतील अध्यापकीय पद भरती केंद्रीय पध्दतीने करण्याच्या शासकीय धोरणाची अंमलबजावणी साठी शासनाकडून विशेष समुपदेशी (Special Counsellor) नेमण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात वृक्ष लागवडीसाठी उन्हाळयापूर्वी खड्डे खणण्यासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येणार नसल्याबाबत**

**(३८) ११८२७६ (३१-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात राज्य शासनाच्या वृक्ष लागवडीच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत सुमारे ७७ लाख वृक्ष लागवडीसाठी उन्हाळयापूर्वी खड्डे खणण्यासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येणार नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्पष्ट करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे अधिकारी व कर्मचारी नागरिकांकडून वर्गणी गोळा करीत आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, वृक्ष लागवडीसाठी खड्डे खणण्यासाठी शासनाकडून अनुदान न मिळण्याची व यासाठी सर्वसामान्य नागरिकांकडून वर्गणी वसूल करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, नाशिक जिल्हयात वृक्ष लागवडीसाठी अनुदान प्राप्त होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) व (५)

नाशिक जिल्हयात सन २०१८ च्या पावसाळयात दि. १ जुलै, २०१८ ते ३१ जुलै, २०१८ या कालावधीत एकूण ७२.३६ लक्ष रोपांची लागवड करण्यात आली आहे. त्याकरिता वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागात विविध योजनांतून एकूण रु.१४५१.७३ लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच वन विकास महामंडळ, नाशिक, ग्रामपंचायत तसेच इतर यंत्रणा यांच्या मार्फत खोदण्यात आलेल्या खडडयांकरिता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच काही ठिकाणी लोकसहभागातून सदर कामे करण्यात आली आहेत.

---

## कोल्हापूर जिल्हयातील छत्रपती प्रमिलाराजे रग्णालयात ( सीपीआर ) व्हेंटिलेटरची संख्या अपुरी पडत असल्याबाबत

**(३९) ११८३४० (०१-०८-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील छत्रपती प्रमिलाराजे रग्णालयामधील ( सीपीआर ) रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता व्हेंटिलेटरची संख्या अपुरी पडत असल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रुग्णालयात सध्यस्थितीमध्ये २७ व्हेटिलेटर उपलब्ध असल्याने ते रुग्णाच्या वाढत्या संख्येमुळे अपुरे पडत असल्याने रुग्णांना खासगी रुग्णालयात जाऊन प्रतिदिनी १५ हजार रुपये खर्च करावे लागत आहेत ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रुग्णालयात कोल्हापूर सह कोकण सीमाभागासह शेजारच्या सांगली, सातारा जिल्हयातून रुग्ण येत असल्याने रुग्णालयातील मुलभूत सुविधांसह व्हेंटिलेटरची संख्या वाढविण्याची मागणी होत आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशह केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालयातील मुलभूत सुविधांसह व्हेंटिलेटरची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१४-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सन-२०१७-१८ व सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षात संस्थेसाठी अनुक्रमे ४ व ५ व्हेन्टीलेटर खरेदी करण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून सदर बाबीची खरेदी प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील जंगलात वन्य प्राण्यांसाठी तयार केलेल्या कृतिम पाणवठे कोरडे पडल्याबाबत

**(४०) ११९५६६ (३०-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात असलेल्या जंगलात वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करण्यासाठी वन विभागाने कृत्रिम पाणवठे जंगल परिसरात तयार केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कृत्रिम पाणवठयापैकी किटाळी, जांभुळविहीरा आणि वढोवना या जंगलातील चारही पाणवठे कोरडे पडले असल्याने या जंगलातील वन्यप्राणी ग्रामीण परिसरात भक्ष्य व पाण्याच्या शोधासाठी येत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण परिसरात वावरणा-या हिंस्त्र प्राण्यांमुळे ग्रामस्थांच्या जिविताला धोका निर्माण झाला असल्याने कोरडे पडलेल्या पाणवठयातील पाणी साठा पुर्ववत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत किटाळी हे गाव रिठी आहे. सदर गावा लगत वनतलाव असून त्यात बारमाही पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे वन्यप्राणी ग्रामीण परिसरात भक्ष्याच्या व पाण्याच्या शोधासाठी येत नाहीत.

(३) मानव वन्यप्रांणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वनक्षेत्रात वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून नागपूर वन विभागाद्वारे सन २०१७-१८ मध्ये १११ कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले आहेत.

• ना-दुरुस्त आलेल्या पाणवठ्याची नियमितपणे दुरुस्ती करण्यात येते.

• कृत्रिम पाणवठ्यावर वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता सोलर पंप बसविण्यात आले आहेत.

• वनक्षेत्रात नियमीत गस्त करुन वन्यप्राण्यांच्या हालचालींचा मागोवा घेण्यात येतो.

• स्थानिक जनतेस वन्यप्राण्यांचे महत्व पटवून देवून जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील वेताळ टेकडीवर वृक्षतोड झाली असल्याबाबत**

**(४१) ११९८४५ (०१-०८-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनविभागामार्फत हद्द निश्चीत करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील वेताळ टेकडीवर भिंत बांधण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भिंतीमुळे अनेक वृक्षांची तोड होणार असून वेताळ टेकडीचे दोन भाग होणार असल्याने तेथील जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०१८) :** (१) सन २०१७-१८ मध्ये पुणे शहरातील राखीव वन क्षेत्राभोवती संरक्षक भिंत बांधणे या राज्य योजनेंतर्गत भांबुर्डा वन परिक्षेत्रातील स.नं. ९६ वेताळ टेकडीवर सिमा भिंत बांधण्यासाठी ई-निविदा काढण्यात येऊन सदर ई-निविदेनुसार कंत्राटदारास कामाचे आदेश देण्यात आले होते.

(२) वेताळ टेकडीचा काही भाग वन विभागाच्या मालकीचा आहे व उर्वरित भाग खासगी मालकीचा आहे त्यानुषंगाने राखीव वनक्षेत्राचे संरक्षण करण्याकरिता भांबुर्डा वन परिक्षेत्रातील स.नं. ९६ वेताळ टेकडीवर सिमा भिंत बांधण्यात येत आहे. सदर सिमा भिंत बांधकामास अडथळा ठरणाऱ्या एकूण ८६ ग्लिरिसीडीया या प्रजातीच्या झाडांची रीतसर परवानगीने तोड करण्यात आली आहे.

तसेच, सदर सिमाभिंत बांधताना वन्यप्राणी, सरपटणारे प्राणी यांना वावरण्यासाठी ठिकठिकाणी लहान मार्गांची व्यवस्था ठेवण्यात येणार असल्यामुळे जैवविविधतेला धोका पोहचणार नसून उलट सिमा भिंतीमुळे झाडे व वन्यजीवांसाठी एक सुरक्षित अधिवास तयार होईल.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुखेड, किनवट, माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील जंगलात होणारी अवैध वृक्षतोड

**(४२) १२०२५९ (३१-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड, किनवट व माहूर (जि.नांदेड) हे तालुके डोंगराळ म्हणून प्रसिध्द असून मागील काही महिन्यांपासून या तालुक्यातील वनक्षेत्रपालाच्या दुर्लक्षामुळे अवैध वृक्षतोड होऊन जंगल नष्ट होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या वनातील वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी मंजूर असलेले उपवन संरक्षक कार्यालयास मंजूरी मिळून आठ वर्षाचा कालवाधीत होऊन गेला तरी कार्यालय प्रत्यक्षात कार्यान्वित झालेले नाही, हे खरे आहे,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उपवन संरक्षक कार्यालय त्वरित कार्यान्वित करण्यासह या वनातील वृक्षांची अवैध तोड करणा-यावर व त्यास संगनमत असणा-या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०१८ मध्ये किनवट तालुक्यातील इस्लापूर वनपरिक्षेत्रात गौडे महागाव येथील राखीव वन सर्वे नं.७८ मधील १९ झाडांच्या अवैध वृक्षतोडीचे एक प्रकरण निदर्शनास आले आहे. त्यातील २६ सागी नग, १.९०३ घमी इतकी आहे. त्याबाबतचा वनगुन्हा दिनांक ४.५.२०१८ रोजी नोंदविण्यात आला आहे. सदर जप्त माल वनपरिक्षेत्र, इस्लापूर कार्यालयात जमा करण्यात आला आहे. सदरील एका प्रकरणामुळे संपूर्ण जंगल नष्ट होत असल्याचे म्हणणे संयुक्तीक ठरणार नाही.

(२) व (३) भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्याची सेवा किनवट क्षेत्राला उपलब्ध आहे. सामाजिक वनीकरण विभागाचे वन विभागामध्ये समावेशन करण्यात आले असल्यामुळे संरक्षण व नियंत्रणाच्या दृष्टीने मुबलक कर्मचारी उपलब्ध आहेत. सहायक वनसंरक्षक, जंकास व कॅम्पा,

किनवट सहा वनसंरक्षक, अतिक्रमण निर्मुलन व संरक्षण, किनवट आणि वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), किनवट या तीन अधिकाऱ्यांचे मुख्यालय तसेच किनवट येथे विभागीय वनव्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग किनवट या वन विकास महामंडळाचे कार्यालय असल्याने नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे नविन उपवनसंरक्षक कार्यालयाची स्थापना करण्याची आवश्यकता नाही.

(४) व (५) वृक्षतोड प्रकरणी तत्कालीन वनपाल चिखली व वनरक्षक गौंडे महागाव यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**हिवरखेड (जि. अकोला) येथील वन परिक्षेत्रांतर्गात वृक्षतोड प्रकरणी**
**वन कर्मचाऱ्यांनी केलेली मारहाण**

**(४३) १२०६२१ (०१-०८-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेड (जि. अकोला) येथील वन परिक्षेत्रांतर्गातील मोहापाणी शिवारात वृक्षतोड प्रकरणी श्री.ओरीवकार यांच्याकडे न्यायालयीन कागदपत्रे असतानाही वन कर्मचाऱ्यांनी त्यांना मारहाण केल्यामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वन परिक्षेत्रात साग वृक्षांची अवैध तोडीकडे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जाते परंतू वृक्षतोड संदर्भात नागरिकाकडे विहित कागदपत्रे असताना देखिल त्यांना त्रास देण्याचे प्रकार घडत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार हिवरखेड वन परिक्षेत्राअंतर्गत होणारी अवैध वृक्षतोड रोखण्यासह तेथील नागरिकांना नाहक त्रास देणा-या वनविभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

श्री. श्रीकृष्ण रामभाऊ ओरीवकर यांचेवर दिनांक २५.१०.२००२ पासून ते आजपर्यंत एकूण ६ वनगुन्हे आकोट वन्यजीव विभाग व प्रादेशिक वन विभाग अकोला यांचेकडून नोंदविण्यात आले आहेत. त्यांना चौकशीकरिता जंगलामध्ये वन अधिकारी/ कर्मचारी घेऊन गेले असता, टेकडे चढत असताना श्री.ओरीवकर हे पाय घसरुन उताराचे दिशेने काही अंतर घसरुन गेल्यामुळे ते जखमी झाले. त्यांना कोणत्याही प्रकारची मारहाण करण्यात आलेली नाही. त्यांचेवर वैद्यकीय उपचार/तपासणी करण्यात आली व त्यांना मा.न्यायालय तेल्हारा यांचे

आदेशानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, तेल्हारा येथे वैद्यकीय तपासणी केली याबाबतचा वैद्यकीय अहवाल मा.न्यायालयात सादर करण्यात आला असून वैद्यकीय अहवालानुसार किरकोळ दुखापत असून त्यांची प्रकृती चिंताजनक नसल्याचे स्पष्ट झाले आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी केली असता तक्रारीत तथ्य आढळून आलेले नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील तुळशी तलावाजवळ वनरक्षकाचा झालेला मृत्यू**

**(४४) १२११५४ (३१-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील तुळशी तलावाजवळील लॉगहट या वन विभागाच्या अतिथिगृहात पार्टी करणा-या वन विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मा.वने मंत्री यांनी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी देखील सदर तलावाजवळ पार्टी दरम्यान वन रक्षकाचा मृत्यू झाला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील वन विभागाच्या अतिथिगृहात झालेल्या पार्टीत सहभागी झालेल्या संबधित वन विभागाच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे,
(२) तुळशी तलावात बुडून श्री. स्वस्तिक काटकर या वनरक्षकाचा दिनांक २५.०४.२०१८ रोजी मृत्यु झाला आहे.
(३) मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांनी दिलेल्या आदेशानुसार वनक्षेत्रपाल, मुळशी यांनी प्राथमिक चौकशी केली आहे. चौकशी अहवालात मृत्यूमागे घातपाताचा प्रकार नसल्याचे नमूद असून, सदर वनरक्षकांनी मृत्युपुर्वी मद्यपान केले असल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त प्रकरणाची सविस्तर चौकशी व तपास मुलुंड पोलीस ठाणे मार्फत सूरु आहे.
(४) मृत वनरक्षक व त्याचे मित्र यांना ठाकुरपाडा येथे पार्टीचे ठिकाणी जाणेकरिता प्रतिबंधीत वनक्षेत्रात अनधिकृत रित्या प्रवेश दिलेल्या प्रकरणी विहार गेट वर कार्यरत असलेल्या तत्कालीन वनरक्षक व त्यांचे मदतनिस वनमजूर यांना त्यांचे कर्तव्यात निष्काळजीपणा केल्यामुळे निलंबीत करण्यात आले होते. सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी अंती त्यांचे निलंबन संपुष्ठात आणुन मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांचे मार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**घाटी (जि.औरंगाबाद) येथे केंद्राच्या राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत ५० खाटांचे रुग्णालय उभारणीबाबत**

**(४५) १२१५७३ (२५-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्राच्या राष्ट्रीय आयुष अभियानातर्गत सन २०१७-१८ मध्ये चार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत ५० खाटांचे रुग्णालय उभारणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी औरंगाबाद जिल्हयातील घाटी येथे एक रुग्णालय उभारण्यासाठी मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निधी मंजूर करण्यात आला होता तथापि जागेची हमी व सविस्तर प्रस्ताव दाखल करण्यासाठी नऊ महिन्याचा कालावधी झाला पण प्रस्ताव दाखल करण्यात आला नसल्याचे माहे फेब्रुवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, घाटी येथे केंद्राच्या राष्ट्रीय आयुष अभियानातर्गत रुग्णालय स्थापनेसाठी जागेची हमी व सविस्तर प्रस्ताव त्वरित सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेंच व्याघ्र प्रकल्प (जि.नागपूर) येथील जैव विविधतेला व व्याघ्र अधिवास क्षेत्राला निर्माण झालेला धोका**

**(४६) १२१७३७ (३०-०७-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच व्याघ्र प्रकल्प (जि.नागपूर) मधिल क्षेत्र २५७.२६ वर्ग किलोमीटर असून शासनाच्या अधिसूचनान्वये गाभा व वाघाचे अधिवास क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २९ ऑक्टोबर, १९९७ च्या अहवालानुसार या परीसरात तोतलाडोह महसूल गाव नव्हते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, तोतलाडोह धरण बांधकामासाठी आलेले अस्थायी मजूरांना धरणाच्या बांधकामानंतर या क्षेत्रात मासेमारीचा व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह सुरु केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मासेमारीमुळे पेच व्याघ्र प्रकल्पातील जैव विविधतेला व व्याघ्र अधिवास क्षेत्राला धोका निर्माण झाला आहे ,हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१८) :** (१) पेंच राष्ट्रीय उद्यानाचे २५७.२६ चौ.कि.मी. इतके क्षेत्र पेंच व्याघ्र प्रकल्पाचे संवेदनशील व्याघ्र अधिवास म्हणुन दिनांक २७.१२.२००७ रोजीच्या शासन अधिसूचने अन्वये घेषित करण्यात आले आहे. तसेच वरील वनक्षेत्रालगतचे मानसिंगदेव अभयारण्याचे एकुण १७२.८६ चौ. कि.मी. क्षेत्र दिनांक ०४.०३.२०१७ रोजीच्या शासन अधिसूचने अन्वये संवेदनशील व्याघ्र अधिवास म्हणुन घेषित करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) तोतलाडोह धरण बांधकामासाठी मध्यप्रदेश व महाराष्ट्रातून आलेले अस्थायी मजुर धरणाच्या बांधकामानंतर बेकायदेशीररित्या राहुन मासेमारीचा व्यवसाय करीत होते. मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपिठ यांनी दिनांक २२.०४.२००२ रोजी दिलेल्या आदेशान्वये तोतलाडोह येथील अनधिकृत वस्त्या हटविण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) पेंच राष्ट्रीय उद्यानात बेकायदेशीरपणे राहत असलेल्या लोकांचे कोणतेही अधिकार नसल्याने व तोतलाडोह तलावामध्ये करण्यात येत असलेली मासेमारी बेकायदेशीर असल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशान्वये सदर क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे.

सन १९९१-९२ ते मे, २०१८ पर्यत बेकायदेशीर मासेमारीचे एकुण ६४९ गुन्हे नोंदविलेले असून ३९,६९५ किलो मासे, ६०६ बोट, ११,९२८ जाळी, १७० टायर ट्युब, १,०६५ सायकली, १२ मोटार सायकल, ९ जीप, १ बस व १ ट्रक जप्त करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच शासकिय मालमत्तेचे नुकसान केल्या प्रकरणी एकूण २४ गुन्हेगारांविरुध्द माहे मे, २०१८ मध्ये गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

सन २०१२ मध्ये विशेष व्याघ्र संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली असून सदर दलातील जवान जलाशयात २४ तास बोटीद्वारे गस्त करतात. तसेच वाहन गस्त, पायदळ गस्त करुन अवैध मासेमारीवर नियंत्रण ठेवण्याचे काम सुरु आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

---

**चिमूर, सिन्देवाही, मूल (जि.चंद्रपूर) परिसरात वाघ व बिबटयाचे होणारे हल्ले**

**(४७) १२२१०२ (३०-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर, सिन्देवाही, मूल (जि.चंद्रपूर) परिसरात वाघ व बिबटयाच्या हल्यात तीन शेतकरी जखमी झाल्याची घटना दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार चंद्रपूर जिल्हयातील गावात वाघ व बिबटयाचे हल्ले रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१८) :** (१) व (२) चिमूर, सिंदेवाही, मुल (जि. चंद्रपूर) परिसरामध्ये माहे मे, २०१८ मध्ये बिबट्याच्या हल्यात २ व्यक्ती किरकोळ जखमी झाले आहे. तसेच वाघाच्या हल्ल्यात १ अज्ञात व्यक्तीचा मृत्यु झाला असून त्याची ओळख पटल्यावर प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येईल.

(३) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• महत्वाच्या ठिकाणी २९ तपासणी नाके उभारण्यांत आलेले आहे, त्यावर रात्र-दिवस वनकर्मचारी कार्यरत असतात.

• वनविभागात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यरत असून गस्तपथक सातत्याने कार्यरत आहे.

• वाघ, बिबट व इतर वन्यप्राणी यांना नागरी वस्तीत येण्यापासून रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे गट तयार करण्यात येवून संरक्षण समितीच्या मदतीने नियमित गस्त करून वन्यप्राण्यांना वनाकडे हुसकावण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

• वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मनुष्य हानी/जखमी, पशु हानी/जखमी व शेतपीक नुकसान भरपाईची रक्कम वेळेवर अदा करण्यात येत आहे.

• ज्या भागात वाघाचे/ बिबटयाचे अस्तित्व आहे त्या ठिकाणी सावधानतेचे इशारादर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत.

• कॅमेरा ट्रॅप लावून वाघ/बिबट यांच्या हालचालींची संनियंत्रण करण्यात येते.

• वनालगत असलेल्या स्थानिक लोकांच्या मुलभूत गरजांचे निराकरण करण्याकरीता स्थानिक स्थरावर अस्थाई डेपो उभारून त्या ठिकाणी निस्तार दराव्दारे बांबू, जलतन व ईत्यादीचा पुरवठा मागणी नुसार करण्यांत येतात.

• बफर क्षेत्रातील गावात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना राबवली जात आहे. त्याअंतर्गत एलपीजी गॅस पुरवठा, शौचालय बांधणे हया उपक्रमांचा समावेश करण्यात आल्याने मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्यास मदत होत आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**सोलापुर जिल्हयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात**
**रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(४८) १२२१६१ (०१-०८-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्हयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात विविध विभागातील मशीन अनेक वर्षापासून बंद असल्यामूळे रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब दिनाक १० मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रुग्णालय प्रशासनाकडून शासनाच्या २५% अव्यवहार नियमाच्या मर्यादा असल्याचे कारण सांगण्या येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार रुग्णालयातील मशीनी दुरुस्त करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-११-२०१८) :** (१) संबंधीत संस्थेच्या विभागातील काही यंत्रसामुग्री बंद होत्या. परंतु प्रत्येक विभागात यंत्रसामुग्रीची पुरेशी संख्या असल्याने रुग्णांची गैरसोय झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) संस्थेतील बंद यंत्रसामुग्री दुरुस्त करुन घेण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४९) १२२२२४ (२३-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात जयलुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामामध्ये कृषी खात्यातील २४ अधिकारी/कर्मचारी तसेच कंत्राटदार यांनी संगनमताने अंदाजे ३५ कोटी रुपयांचा अपहार केला असल्याचे प्रकरण दि. ६ मार्च २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द फौजदारी खटले दाखल करण्याबाबतचे आदेश आयुक्त, कृषी, पुणे यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली असून जबाबदार दोषी अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे व त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी तसेच ठेकेदारांवर F.I.R. दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**सिहोरा (जि. भंडारा ) परिसरात शासकीय जमिनिवरील झाडांची होणारी अवैध वृक्षतोड**

**(५०) १२६३१५ (३१-०७-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिहोरा (जि. भंडारा ) परिसरात मुख्य कालव्यावरील शासकीय जागेत असलेली वृक्ष कंत्राटदार कडून अवैधरित्या तोडण्यात येत असून याकडे वनविभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०९-२०१८) :** (१) व (२) सदरचे क्षेत्र हे वनक्षेत्र नसून पाटबंधारे विभागाचे अखत्यारीतील आहे. पाटबधारे विभागाने कळविल्यानुसार क्षेत्राची पाहणी केली असता सदर क्षेत्रामध्ये खैर प्रजातीचे २ थुट दिसून आले. तेथे पडलेला २ नग इमारती व जळाऊ वनोपज जप्त करुन वृक्षतोड अधिनियम १९६४ अंतर्गत प्र.सु.री.क्र.२६१/५ दिनांक २१.५.२०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी आरोपी आढळून न आल्याने प्रकरण नस्तीबध्द केले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.